सकाळ

# महिला, सैनिक, ज्येष्ठांना वाढीव व्याजदराचा लाभ

## चौगुले : रवळनाथ संस्थेच्या ठेवीच्या व्याजदरात वाढ



एम. एल. चौगुले

गडहिंग्लज, ता. ३१ : 'रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीने ठेवीवरील व्याजदरात अर्ध्या टक्क्याने वाढ केली असून, त्याचा लाभ महिला, ज्येष्ठ नागरिक, आजी-माजी सैनिकांना होणार आहे,' अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, 'संस्थेच्या प्रगतीत सभासदांचा मोठा वाटा आहे. यामुळे ठेवीदार व सभासदांना योग्य परतावा मिळावा यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक व सैनिकांसाठी ठेवीवर ८.७५ तर ८० वर्षांवरील अतिज्येष्ठ सभासदांसाठी ९ टक्के व्याजदर दिला आहे. १ फेब्रुवारीपासून हे नवे दर लागू होतील. संस्थेकडे सध्या ४१६ कोटी ८६ लाखांच्या ठेवी असून, ३१० कोटी ५ लाखांचे कर्जवाटप केले आहे. १४६ कोटींची गुंतवणूक असून, संस्थेचा एकूण संमिश्र व्यवसाय ७२७ कोटींचा आहे. संस्थेला सातत्याने ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. सभासद, कर्जदार, ठेवीदारांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याचा संचालकांचा प्रयत्न आहे. त्याचाच भाग म्हणून ठेवीवरील व्याजदर वाढविले आहेत. ग्राहकांनी या वाढीव व्याजदराचा लाभ घ्यावा.'

उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. दत्ता पाटील, डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय आरबोळे, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार, सीईओ डी. के. मायदेव आदी उपस्थित होते.

Kolhapur, Kopjillha
01/02/2024 Page No. 3